International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol. 7 No. 2 January – February - 2026

# मैत्रैयी पुष्पा यांच्या निवडक कादंबऱ्यांतील स्त्रीजाणीव

**डॉ. जयश्री बाबर**

*सावित्रीबाई फुले महिला महाविद्यालय, सातारा*

*Corresponding Author – डॉ. जयश्री बाबर*

DOI - 10.5281/zenodo.18654264

**प्रस्तावना:**

समाज आणि साहित्य यांचा अत्यंत जवळचा संबंध आहे. साहित्य, कला, संगीत यांना स्वत:चे वेगळे अस्तित्व असले, तरी त्यावर समाजाचा प्रभाव पडलेला असतो. साहित्यात समाजाचे प्रतिबिंब पडलेले असते. त्यामुळे साहित्याचा विचार समाजासंदर्भात करावा लागतो. साहित्यामधून समाजाचे चित्रण होते म्हणजे एक प्रकारे व्यक्ती, त्यांच्या समस्या, राग, लोभ, आनंद, दु:ख अशा घटकांचे साहित्यामधून चित्रण होत असते.

**उद्देश:**

१) मैत्रैयी पुष्पा यांच्या निवडक कादंबऱ्यांतील स्त्री जाणिवांचा अभ्यास करणे
२) मैत्रैयी पुष्पा यांच्या निवडक कादंबऱ्यांतील सामाजिक-सांस्कृति घटकांचा चिकित्सक मागोवा घेणे.
३) मैत्रैयी पुष्पा यांच्या निवडक कादंबऱ्यांतील स्त्री जाणिवांच्या अभिव्यक्ती बदलांचा अभ्यास करणे.

**गृहितके:**

१) मैत्रैयी पुष्पा यांच्या निवडक कादंबऱ्यांतील स्त्री पात्रे पारंपरिक चौकटीत अडकून राहत नाहीत ती स्वतंत्र, आत्मभान जागृत झालेली, संघर्ष करणारी अशा रूपात व्यक्त झाली आहेत.
२) तत्कालीन सामाजिक व सांस्कृतिक परिस्थितीचा कादंबऱ्यांतील स्त्री पात्रांच्या जीवनावर खोलवर परिणाम झालेला आहे.
३) मैत्रैयी पुष्पा यांच्या कादंबऱ्यांमध्ये काळानुसार स्त्री जाणिवांच्या अभिव्यक्तीत बदल झाल्याचे दिसून येते.

**संशोधन पद्धती:**

साहित्याचे मूल्यमापन करण्याच्या आस्वादक समीक्षा, रूपवादी समीक्षा, चरित्रात्मक समीक्षा, मानसशास्त्रीय समीक्षा, आदिबंधात्मक समीक्षा, ऐतिहासिक समीक्षा, समाजशास्त्रीय समीक्षा, मार्क्सवादी समीक्षा, तौलनिक साहित्याभ्यास पद्धत अशा काही पद्धती आहेत. याठिकाणी मैत्रैयी पुष्पा यांच्या कादंबऱ्यांतील स्त्री जाणीवांचा अभ्यास करण्यासाठी आवश्यकतेनुसार वरील संशोधन पद्धतींचा वापर केला जाणार आहे.

**अभ्यासाचे महत्व:**

प्रस्तुत अभ्यासातून मैत्रैयी पुष्पा यांच्या निवडक कादंबऱ्यांतील स्त्री जाणिवांचे स्वरूप व बदलते आयाम स्पष्ट होतात. त्यामुळे आधुनिक हिंदी स्त्रीवादी साहित्याचा वैचारिक प्रवाह समजून घेण्यास हा अभ्यास उपयुक्त आहे. स्त्री जीवनाशी निगडित सामाजिक-सांस्कृतिक घटकांचा चिकित्सक मागोवा घेतल्यामुळे पितृसत्ताक व्यवस्था,

परंपरा, रूढी, आर्थिक विषमता व सामाजिक बंधने यांचा स्त्री व्यक्तिमत्त्वावर होणारा परिणाम अधोरेखित करता होतो. एकूणच, मैत्रैयी पुष्पा यांच्या कादंबऱ्यांतील स्त्रीवादी जाणिवांचा सुसंगत व समग्र अभ्यास केल्यानंतर आपल्या असे लक्षात येईल की, जागतिकीकरण, शिक्षण, आर्थिक स्वावलंबन, बदलती सामाजिक मूल्यव्यवस्था यांचे स्त्रीवादी विचारप्रवाहांच्या पार्श्वभूमीवर साहित्यातील चित्रण बदलले आहे. या बदलांचा चिकित्सक मागोवा घेणे आवश्यक ठरते. प्रस्तुत अभ्यासामुळे समकालीन हिंदी लेखिका मैत्रैयी पुष्पा यांच्या कादंबऱ्यांतील बदलत्या स्त्री जाणिवांचे स्वरूप स्पष्ट होईल.

**मैत्रेयी पुष्पा यांचे साहित्य**:

मैत्रेयी पुष्पा यांनी १९९० नंतर लेखन करण्यास प्रारंभ केला. स्त्रियांना समाजात दुय्यम वागणूक दिली जाते याच्या विरोधात त्या आजही लेखन करत आहेत. लेखिकेने कथा, कादंबरी, नाटक, आत्मकथा, या हिंदी साहित्यप्रकारात लेखन केले आहे. याविषयी त्यांचे स्त्रीविषयक वैचारिक साहित्य प्रसिद्ध आहे. लेखिकेच्या कादंबऱ्यामधून समाजातील स्त्रियांचे दुय्यमत्व, वैवाहिक समस्या, राजकारणाचा स्त्रियांच्या जीवनावर होणारा वाईट परिणाम, ग्रामीण भागातील स्त्रियांच्या विविध समस्या, स्त्री शिक्षणाचा प्रश्न असे अनेक विषय आले आहेत.

**मैत्रेयी पुष्पा यांचे कादंबरी क्षेत्रातील योगदान:**

१) 'बेतवा बेहती रही' (१९९३), २) 'इदन्नमम' (१९९४), ३) 'चाक' (१९९७), ४)'झुलानट' (१९९९), ५)'अल्मा कबुतरी'(२०००), ६)'अगनपाखी'(२००१), ७) 'विजन'(२००२), ८)'कही इसुरी फाग'(२००४), ९) 'त्रिया हठ'(२००६)

मैत्रेया पुष्पा यांनी साहित्य क्षेत्रात विविध साहित्यप्रकारात लेखन केले असल्याचे दिसून येते. लेखिकेने प्रामुख्याने स्त्रियांच्या विविध समस्यांना कादंबरीमधून स्थान दिले आहे. स्त्रीजीवनाचे वास्तव चित्रण करताना त्यांची लेखणी विद्रोही लेखन करण्याकडे वळते. त्यामुळे हिंदी साहित्यामध्ये स्त्रीवादी अंगाने विद्रोही लेखन करणारी लेखिका म्हणून मैत्रेयी पुष्पा यांना ओळखले जाते. त्यांच्या कादंबरीमधून आलेली स्त्री प्रामुख्याने ग्रामीण भागातील आहे. त्यामुळे ग्रामीण भागातील व काही प्रमाणात शहरी भागातील स्त्रियांना त्यांच्या अस्तित्वाची जाणीव व्हावी यासाठी लेखिका साहित्यामधून तशी मांडणी करताना दिसते.

**मैत्रेयी पुष्पा यांच्या निवडक कादंबऱ्यांतील स्त्रीजाणीव:**

संशोधन विषयाच्या अनुशंगाने या ठिकाणी मैत्रैयी पुष्पा यांच्या निवडक कादंबऱ्यांतील स्त्रीजाणीवा अभ्यासण्याचा उद्देश आहे. मैत्रेयी पुष्पा यांच्या कादंबऱ्यामधून नातेसंबंध, प्रेमभावना व मैत्रभावनेचे चित्रण, स्त्रियांच्या समस्या, अस्तित्वशोधासाठी प्रयत्नशील असणाऱ्या स्त्रिया, आधुनिकता, विवाहसंस्थेबद्दल मतमतांतरे, निवेदनशैली, भाषाविशेष, वातावरण निर्मिती, व्यक्तिचित्रणे, घटना-प्रसंग अशी विविध आशयसूत्रे दिसून सांगता येतील. याशिवाय लेखिकेच्या कादंबऱ्यांवर सामाजिक, राजकीय, प्रादेषिक, आर्थिक, सांस्कृतिक प्रभाव आहे.

**विधवा स्त्रियांचे जीवन चित्रण:**

मैत्रेयी पुष्पा यांच्या सर्वच कादंबऱ्यामधून विधवा स्त्रियांचे चित्रण आले आहे. 'चाक', 'इदन्नमम', 'अगणपाखी', 'कही इसूरी फाग' सारख्या कादंबऱ्यांमधील रेशम, प्रैम, भुवन, रज्जो या विधवा स्त्रिया, विधवांसाठी असलेले पारंपरिक नियम न स्वीकारता, विद्रोही निर्णय

घेतात व त्यातून उद्भवलेल्या समस्यांचा सामना करतात. कादंबरीमधून आलेल्या विधवा नायिकांचे जीवन, त्यांच्या समस्या यामध्ये काळाच्या ओघात बदल होतो असे चित्र दिसते. उर्वशी, बऊ, रज्जो, रेशम, प्रैम, भुवन या सर्व विधवा स्त्रियांचे दु:ख एकसारखे नाही. त्यांच्या सभोवतालची परिस्थिती व त्यातून उद्भवलेल्या समस्या वेगवेगळ्या आहेत. या सर्वांमध्ये उर्वशी व भुवन मात्र सर्व बाजूंनी त्रासलेल्या आहेत. त्यांना पतीचे सुख मिळत नाहीच, शिवाय कुटुंबातील इतर लोकांचेही त्यांना पूर्ण सहकार्य मिळत नाही. सर्वच विधवा स्त्रिया वैधव्याचे नियम स्वीकारतात असे नाही, तर काही त्याला विरोधही करताना दिसतात. आजवर चालत आलेला मार्ग सोडून नवीन मार्गावर चालणाऱ्या विधवा स्त्रियांचे भावविश्व ‘चाक’, ‘इदन्नमम’,‘अगणपाखी’ सारख्या कादंबऱ्यामधून रेखाटले गेले आहे. विधवा स्त्रीने विधवामाता होणे पाप समजले जाते.

‘चाक’ कादंबरीध्ये रेशम या विधवा स्त्रिच्या गरोदरपणाची कहाणी कोणती समस्या उभी करते याचे वास्तव चित्रित आले आहे. रेशम पतीच्या मृत्युनंतर गरोदर राहते. पण त्याबद्दल तिला अपराधी वाटत नाही. घरच्यांकडून तिला विरोध होतो. डोरीया म्हणजे तिचा दीर याच्याबरोबर लग्न करण्यासाठी, तिला बोल सुनावले जातात. पण ती तयार होत नाही. बाळाला जन्म देऊन, त्याला स्वत:चे नाव देण्याचा ती विचार करते. स्वत:चे आईपण तिला अवैध वाटत नाही. बाळाच्या पित्याचे नाव ती गुप्त ठेवते. ती शास्त्र, पुराण, रीती-रिवाज यांना महत्त्व देत नाही. विधवा फक्त विधवा नसते तर ती एक स्त्री असते. माणूस असते. तिला इच्छा, आकांक्षा असतात, असे विचार असणारी रेशम दुसऱ्यांच्या मतापेक्षा स्वत:च्या मताला महत्त्व देताना दिसते. स्वत:चे आईपण समाजाचा रोष पत्करून आनंदाने स्वीकारते. विधवा स्त्रियांनी इच्छांचे दमन करून, स्वत:ला अविरत कष्ट द्यायचे आणि त्यातच तिचे अस्तित्व सुरक्षित आहे असे गृहीत धरायचे, या मान्यतांना तिचा विरोध आहे. ती बाळाला जन्म द्यायचा असे ठरवते. विधवेने जिवंत राहायचे पण त्या देहरूपी झाडाला जर फुले, फळे लागली तर त्यात गैर काय आहे? असा प्रश्न ती रेशमला विचारते. ऋतुनुसार झाड फुलते, फळते मग स्त्री ऋतुमती असताना फक्त पती जिवंत नाही या कारणास्तव तिने आई व्हायचे नाही हा न्याय तिला मान्य नाही. ती सारंगला म्हणते, “...लोग कभी मुझे देबी बनाते हैं तो कभी राच्छसी। देबी तो पत्थर की होती हैं, मैंने कह दिया। उसका ठौर मंदिर में होता है और राच्छसी लोगों का सत्यानाश करती है। मैं दोनों की तरह की नहीं हाड़-मांस की बनी लुगाई, जिसके पेट में बालक है,....मैं कहती हूँ तुम मुझे मेरे हाल पर छोड़ दो। मेरी छातियों का दूध मत सुखाओं। अपनी नाँद पर चरती गाय-भैंसों से भी गई-बीती करके मान रहे मुझे। रंडी सास अपने पूत को तो रोती है और मेरे बालक की हत्या पर उतारू है।”[१] रेशमच्या रूपात विधवा स्त्रीच्या वेदनांना शब्दरूप मिळाले आहे. रेशमसारख्या कित्येक विधवा स्त्रियांना मोकळेपणाने जगावे वाटते. बाहेरील रंगबिरंगी दुनियेचा अनुभव घ्यावा असे वाटते. पण ते सहज शक्य होताना दिसत नाही. रेशमसारखी एखादीच आधुनिक पद्धतीने विचार करून, सगळ्यांना विरोध करत स्वच्छंदी जीवन जगते. घरच्यांच्या विरोधात जाणारी रेशम, तिने स्वीकारलेल्या मार्गावर सुरक्षित नसते. तिची घरच्यांकडून हत्या होते. अशा खुनाच्या केसेस, स्त्री वाईट चालीची होती असे म्हणून मिटविल्या जातात. रेशमची केसही तशीच मिटवली जाते. स्त्रियांना स्वातंत्र्य हवे आहे, पण त्या स्वातंत्र्यात ती सुरक्षित आहे का? की अजून नवीन आव्हाने तिच्या समोर उभी आहेत? असे मौलिक प्रश्न रेशच्या घटनेतून उभे राहतात. ‘चाक’मधील दुसरी विधवा स्त्री पांचन्ना बीबी सुद्धा स्वत:ला हवे तसे वागण्यात धन्यता

मानते. प्रेमात पडल्यानंतर ती स्वत:ला मुक्त मानते. कुणाच्या दाबाखाली राहणे तिला पसंत नाही.

'इदन्नमम'मधून बऊ (दादी) आणि प्रैम या दोन विधवा स्त्रियांची कथा येते. दादी आणि प्रैम या दोन व्यक्तिरेखा, दोन पिढीच्या स्त्री व्यक्तिरेखा आहेत. दादी तिची नात मंदाच्या बाबतीत काळजीपूर्वक वागते. मुलगा महेन्दर याचा आदर्श घेऊन मंदाने वागावे असे तिला वाटते. 'इदन्नमम' कादंबरीत स्वतंत्र मनोवृत्तीची प्रैम ही विधवा स्त्री आपल्याला भेटते. विधवा झाल्यानंतर ती प्रेमविवाह करते. वैधव्याच्या दु:खात तिला आयुष्य घालवायचे नसते. प्रैम घर सोडून तिच्या प्रियकरासोबत पळून जाते. पण तिच्यावर झालेले संस्कार, मुलगी मीरा हे ती विसरू शकत नाही. बऊ भर तारुण्यात विधवा होते. पण सासरच्या लोकांना तक्रार करण्यास जागा देत नाही. तिच्या शरीरावर, पैशावर अनेकांची नजर असते. तेव्हा ती विचार करून निर्णय घेते आणि संसार सुखाचा करून दाखवते. म्हातारपणापर्यंतचे आयुष्य व्यवस्थित काढले याचा अभिमान बऊला असतो. पण वैधव्यामुळे जे कष्ट भोगावे लागतात, ते ती विसरलेली नाही. ती म्हणते, "हँसी-खेल नहीं है विधवा जनी का इज्जत-आबरु से रहना,.... ऐन भोगना भोगी हैं, पर मजाल है कि को को ऊँगरिया उठा जाए।"[२] सून संपत्तीसाठी बऊवर केस घालते. त्या परिस्थितीतही बऊ धाडसाने वागते. दुबळेपणा सोडून सुनेला तोडीस तोड उत्तर देते. विधवा स्त्रीवर एखाद्या परपुरूषाने कितीही प्रेम केले तरी ती घराचा उंबरा ओलांडताना दिसत नाही. कारण तिला रूढी, परंपरा, पुरुषांचे मत, घराचा सन्मान स्वत:च्या मतापेक्षा जास्त महत्त्वाचे वाटते. एखादीच विधवा स्त्री स्वत:चे निर्णय, आवड याला महत्त्व देते व त्यानुसार वागण्याचा प्रयत्न करते. समाजाचा या स्त्रियांच्याकडे बघण्याचा दृष्टिकोन 'वाईट चालीची' असा असतो.

'इदन्नमम' कादंबरीमधून प्रैमच्या माध्यमातून अशी विधवा स्त्री रेखाटली आहे. बऊ विधवांसाठी असलेल्या नियमांचे काटेकोर पालन करते. पण प्रैम तसे न करात प्रेमविवाह करते. विधवा स्त्रीने पुनर्विवाह करते, ही घटना कादंबरीला वेगळ्या वळणावर घेऊन जाते. प्रैमची मुलगी मंदा कादंबरीच्या केंद्रस्थानी असली, तरी कथानकाची प्रमुख सूत्रधार प्रैम आहे. कारण तिने दुसरा विवाह केला नसता तर मंदाच्या आयुष्यात ज्या वाईट घटना घडल्या त्या घडल्या नसत्या. म्हणजे विधवा पुनर्विवाह व त्यातून उद्भवलेले प्रश्न हे कादंबरीचे मुख्य सूत्र आहे. विधवा स्त्रियांना स्वत:च्या मताप्रमाणे जगण्याचा अधिकार नसतो, त्यांनी इतरांच्या प्रगतीसाठी आपले आयुष्य घालवायचे असते असा सर्वसाधारण समज बऊसारख्या अनेक स्त्री-पुरुषांचा आहे. बऊ प्रथा, परंपरांचा आदर करते. पण या प्रथा, परंपरा म्हणजे विधवा स्त्रीला कालकोठडीची शिक्षा असल्यासारखे आहे. अशा आशयाचे विवेचन कादंबरीमधून येते. एकंदरीत बऊचे विचार ऐकून मंदा विचारात पडते, ".....लेकिन किस स्त्री में देह की भूख नहीं रहती? विधवा होने पर क्या सूख जाते हैं स्रोत? तू सच बता मन्दा, क्या तुझे नहीं वे इच्छाएँ, कामनाएँ, आकांक्षाएँ? तू भी तो अब तक कुँआरी क्या तू सामान्य नहीं? अपने-आपसे प्रश्न करती है मन्दाकिनी।"[३] व्यक्तीच्या आयुष्यात भूक, झोप, भीती यांचे जसे अस्तित्व आहे तसे प्रेम या भावनेचे सुद्धा अस्तित्व आहे असे मंदाचे मत असते. मैत्रेयी पुष्पा यांच्या 'इदन्नमम', 'बेतवा बहती रही', 'चाक' या कादंबऱ्यामधून विधवा स्त्रियांच्या आयुष्यातील संपत्तीचा प्रश्न, त्यांच्या प्रेमसंबंधातून निर्माण झालेले प्रश्न, पुनर्विवाहाचा प्रश्न, विधवामाता समस्या यांचे चित्रण करण्याचा प्रयत्न झाला आहे.

**अस्तित्वशोधाची जाणीव:**

मैत्रेयी पुष्पा यांच्या कादंबरीमधून आलेल्या नायिका जुन्यापरंपरा, रूढी यांना नकार देताना दिसतात. आपण आयुष्यात काय कमावले आणि काय हरवले याचा विचार करताना त्या जन्म-मृत्यूचा विचार करतात. स्वत:चे अस्तित्व जपण्यासाठी संघर्ष करतात. 'बेतवा बेहती रही', 'इदन्नमम', 'चाक', 'झुलानट', 'अल्मा कबुतरी', 'अगनपाखी', 'विजन', 'काही इसुरी फाग' या कादंबऱ्यामधून आलेल्या नायिका शारीरिक, मानसिक पातळीवर स्वतंत्र होऊ पाहतात. फक्त पतीची स्त्रीच्या देहावर सत्ता असते हे 'चाक'मधील सारंगला मान्य नाही. स्वत:च्या देहाला संपूर्ण स्वातंत्र्य असावे असे तिला वाटते. गावातील गजाधरसिंह, खुबाराम, फत्तेसिंह, भवानीदास, पंडित चरणसिंह या पुरुषांच्या क्रिया-प्रतिक्रियावर सारंग म्हणते, "ये पुरुष-महापुरुष शाबासी के पात्र है या धीक्कार के ? इतकी लाज-लिहिज हम क्यों करते हैं? हम सारी अवस्था शीश झुकाकर काट देते हैं इनके सम्मान में, क्यों?।"[४] सामाजिक व्यवस्थेच्या विरोधात उभी राहिलेली सारंग स्वत: या प्रश्नाचे उत्तर देऊ शकत नाही. स्त्रीच्या शारीरिक, मानसिक हत्येला पुरुष जबाबदार असतात. तरीही वेळप्रसंगी ते फक्त बघ्याची भूमिका घेतात. स्त्रियांच्यावर अन्याय होतो तेव्हा हेच पुरुष बहिरे, आंधळे होतात. या अशा पुरुषांना स्त्रीचे संरक्षक कसे म्हणायचे? ज्या पुरुषासमोर स्त्री मान खाली घालून उभी राहते त्या पुरुषाचे कर्तृत्व नेमके काय आहे? असे प्रश्न सारंगला पडतात. बुरख्यात राहून पुरुषांच्यासमोर मान खाली घालणे म्हणजे त्यांच्या कृतीचे समर्थन केल्यासारखे आहे, याची सारंगला जाणीव आहे. हे प्रश्न अतरपूर गावाबरोबरच, भारतीय संस्कृतीला पुनर्विचार करायला लावणारे आहेत. सर्व पीडित स्त्रियांना न्यान मिळावा अशी सारंगची इच्छा आहे. पुरोगामी विचारांची सारंग पिढ्यानपिढ्या चालत आलेल्या रुढींच्या विरोधात आहे. सारंगच्या रूपात एक जाणीव जागृती झालेली स्त्री दिसते. रेशम विधवा असूनही गरोदर आहे. मात्र ती स्वत:सह पोटातील बाळाच्या अस्तित्वासाठी आप्तस्वकीयांशी लढा देते. एकूणच गावातील स्त्रियांना न्याय मिळवून देण्यासाठी प्रयत्न करणे, त्यांच्या अस्तित्वासाठी पुरुषांच्या विरुद्ध लढणे यासाठी सारंग प्रयत्न करत राहते. रेशमलाही स्व-अस्तित्वासाठी सासू, दिर, गावातील लोकांना धैर्याने तोंड द्यावे लागते. सारंग, रेशम, चाची या स्त्रिया साहसी आहेत. त्या आपले अस्तित्व जपण्याचा पूर्ण प्रयत्न करत राहतात.

'विजन' कादंबरीमध्ये डॉ. आभा व डॉ. नेहाला स्वत:च्या अस्तित्वासाठी लढावे लागते. लग्न करण्यास विरोध करणारी नेहा, लग्नानंतर करियरच्या मार्गातून बाजूला फेकली जाते. तिचे शिक्षण, हुशारी याला किंमत राहत नाही. ती अंतर्मुख होऊन आपल्या करिअरचा विचार करत राहते. लग्नापूर्वीची नेहा कुठे हरवली, ती कशी होती आणि लग्नानंतर ती अशी का आहे, असे आत्ममग्न करणारे प्रश्न तिला पडत राहतात. एके ठिकाणी ती म्हणते, "पुराणी नेहा को नई डॉ. नेहा शरण ढकती चली जा रही थी। ससुर को प्रणाम करके अपनी हठधर्मिता को क्षमा करती जा रही थी।"[५] लग्न झाल्यानंतर नेहा स्वत:पासून, स्वत:च्या करियरपासून लांब जाते आणि हे तिला क्षणोक्षणी जाणवत राहते. सारंगसारखी ती परिस्थितीला प्रखर विरोध करत नाही. स्वत:च्या गुलामीचे तिला रडके हसू येते. ती अंतरमग्न होत जाते. डॉ. आभाला सुद्धा लग्नानंतर अनेक संकटांना तोंड द्यावे लागते. तिच्या प्रोफेशनमध्ये बदल करण्यासाठी तिला अनेक विनवण्या केल्या जातात; पण ती स्वत:च्या निर्णयावर ठाम राहते. प्रसंगी विद्रोही भूमिका घेते. 'कही इसुरी फाग'मधील संशोधक विद्यार्थिनी ऋतूला रज्जो व इसुरी यांच्या प्रेमकथेचा शोध घेत असताना, स्वत:चे अस्तित्व जपण्यासाठी प्रयत्न करावे लागतात. इसुरीच्या

प्रेमासाठी घर सोडून जाताना रज्जोला मुलगी, सून, पत्नी या नात्यांचा त्याग करावा लागतो. शेवटी ज्या प्रेमासाठी ती सर्वसोडून जाते, ते प्रेमाचे नातेही पूर्ण होऊ शकत नाही. पुरुषसत्ताक समाजव्यवस्थेमध्ये रज्जोला स्वत:च्या संरक्षणार्थ हरघडी प्रयत्न करावे लागतात. अनेक स्त्रियांना असे वाटते की, एखादा पुरुषाबरोबर आहे म्हणजे आपण सुरक्षित आहोत पण, हा संरक्षकच भक्षक होतो तेव्हा स्त्रीचे अस्तित्व धोक्यात येते आणि याला रज्जो अपवाद नाही.

मैत्रेयी पुष्पा त्यांच्या कादंबरीमधून आलेल्या स्त्री व्यक्तिरेखा या संवेदनशील, स्वयंभू, आपल्या आयुष्याकडे डोळसपणे पाहणाऱ्या, सारासार विचार करण्याऱ्या, कर्तृत्ववान अशा आहेत. सारंग, डॉ. आभा, रज्जो, शीलो या स्त्रीया स्वत:चे स्वतंत्र अस्तित्व जपण्यासाठी प्रयत्न करताना दिसतात.

**निष्कर्ष:**

१) मैत्रैयी पुष्पा यांच्या निवडक कादंबऱ्यांच्या अभ्यासातून असे दिसून येते की कादंबरीतील नायिका आत्मशोध घेतात व जे अन्यायकारक आहे त्याचा प्रतिकार करतात.

२) सामाजिक-सांस्कृतिक घटकच स्त्रीचे जीवन मर्यादित करतात असे प्रभावी चित्रण कादंबऱ्यांमधून आले आहे.

३) स्त्री जाणिवांच्या अभिव्यक्तीत झालेला बदल हा स्त्रीच्या वैचारिक प्रगल्भतेचे द्योतक आहे. ‘बेतवा बेह्ती रही’ कादंबरीतील पारंपरिक स्त्री प्रतिमेपासून ‘विजन’ या कादंबरीतील आधुनिक, स्वाभिमानी व स्वतंत्र स्त्री प्रतिमा इथपर्यंतचा झालेला प्रवास कादंबऱ्यांमधून अधोरेखित झाला आहे.

४) एकूणच मैत्रैयी पुष्पा यांच्या कादंबऱ्या स्त्रीवादी साहित्यपरंपरेला समृद्ध करणाऱ्या असून स्त्री जीवनाच्या वास्तव अनुभवांना कलात्मक व चिकित्सक स्वरूपात मांडतात.

**संदर्भ ग्रंथ:**


१) मैत्रेयी पुष्पा, ‘चाक’, राजकमल प्रकाशन, नयी दिल्ली, तीसरी आवृत्ती, २००९,पा. नं. २१

२) मैत्रेयी पुष्पा, ‘इदन्नमम’ किताबघर प्रकाशन, नयी दिल्ली, पाचवी आवृत्ती, २००६, पा. नं. २६७, २६८

३) मैत्रेयी पुष्पा, ‘कही ईसुरी फाग’, राजकमल प्रकाशन, नयी दिल्ली, पहिली आवृत्ती, २००६, पा. नं. ७२

४) मैत्रेयी पुष्पा, ‘चाक’, राजकमल प्रकाशन, नयी दिल्ली, तीसरी आवृत्ती, २००९,पा. नं. 14

५) मैत्रेयी पुष्पा, ‘विजन’, वाणी प्रकाशन, नयी दिल्ली, पहिली आवृत्ती, २००२, पा. नं., ३९